ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८५ • मंगळवार दि.११ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवकांचा गदारोळ

## वंचित व काँग्रेस नगरसेवकांनी विषय पत्रिका हवेत उडवून केला सभात्याग





नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेत विरोधी पक्षांच्या नगरसेवकांचे विषय महापौर कविता मुळे हे घेत नाहीत. मुलभूत प्रश्न सर्वसाधारण सभेत विचारु देत नसल्याचा आरोप करीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांनी गोंधळ घातला. विषयपत्रिका हवेत उडवित सभात्याग केला.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापौर सौ.कविता संतोष मुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज (मंगळवार) सकाळी महापालिकेच्या इमारतीमधील कै.डॉ.शंकरराव चव्हाण मध्यवर्ती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेला आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, नगरसचिव अजितपालसिंघ संधु उपस्थित होते. सर्वसाधारण सभेचे कामकाज प्रारंभ होताच वंचित व काँग्रेसच्या नगरसेवकांनी आक्रमक भूमीका घेतली. महापौर कविता मुळे ह्या सर्वसाधारण सभेतील विषय पत्रिकेवर विरोधी पक्षांच्या नगरसेवकांचे ठराव घेत नाहीत असा आरोप विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी केला. मुलभूत प्रश्नांवर सभागृहात नगरसेवकांना बोलू दिले जात नसल्याचा आरोप गटनेते प्रशांत इंगोले यांनी केला. विषय पत्रिकेवरील विषय चर्चा करण्या अगोदर मुलभूत प्रश्नांवर सभागृहात चर्चा करावी अशी मागणी त्यांनी केली. महापौर कविता मुळे विषय पत्रिकेवर वरील विषय संपल्यानंतर चर्चा करण्यात येईल, घोषणाबाजी करु नका, जागेवर बसा असे त्यांनी नगरसेवकांना सांगितले. नगरसचिव अजितपालसिंघ संधु हे विषय पत्रिकेवरील विषय वाचन करीत असतांना काँग्रेस व वंचितच्या नगरसेवकांनी घोषणाबाजी करत विषय पत्रिका हवेत उडवित सभात्याग केला. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु झाले. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या ढिसाळ कारभारा विरुध्द नगरसेवकांनी आक्रमक भूमीका घेवून प्रशासनाला धारेवर धरले. आरोग्य विभागात अनेक पदे रिक्त आहेत. मनुष्यबळ पान ४ वर

# विधिमंडळातील फूट म्हणजे पक्षातील फूट नव्हे

## सिब्बलांचा निवडणूक आयोगाच्या निर्णयावर सवाल



नवी दिल्ली:शिवसेनेतील फुटीच्या प्रकरणात विधिमंडळ पक्षातील फूट हीच राजकीय पक्षातील फूट मानून निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय चुकीचा असून आयोगाने अधिकारक्षेत्राचा गैरवापर केला, असा जोरदार युक्तिवाद ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात केला.

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना कोणाची यावर आज पुन्हा युक्तीवाद सुरु झाला आहे. यावेळी युक्तीवाद करतांना ॲड.कपिल सिब्बल म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर केवळ विधिमंडळ गटात फूट पडली होती. मूळ शिवसेना पक्षात फूट पडली नव्हती. त्यामुळे आमदारांच्या बहुमताच्या आधारे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देणे योग्य नव्हते, असे सिब्बल यांनी सांगितले. निवडणूक आयोगाच्या चिन्ह आदेशातील परिच्छेद १५ चा संदर्भ देत सिब्बल म्हणाले की, मूळ राजकीय पक्षात फूट पडून प्रतिस्पर्धी गट निर्माण झाल्यानंतरच आयोगाला अधिकार प्राप्त होतो. विधिमंडळ पक्षाची स्वतंत्र बैठक किंवा स्वतंत्र गट म्हणजे पक्षात फूट नव्हे.

### मुख्य नेता पदावरून सवाल

शिवसेनेच्या १९९९ च्या पक्षघटनेत मुख्य नेता असे पदच नाही. मग शिंदे यांनी स्वतःला हे पद कोणत्या आधारावर बहाल केले, असा सवाल सिब्बल यांनी केला. बंडानंतर निर्माण झालेल्या पदांना पक्षघटनेचा आधार देता येणार नाही, पान ४ वर

# समाजकार्याची स्वतंत्र विद्याशाखा;हदगावला सत्र न्यायालय

## राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ महत्वपूर्ण निर्णय

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये समाजकार्य शिक्षणासाठी स्वतंत्र विद्याशाखा, नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करणे तसेच भूसंपादनाच्या मोबदल्यावरील व्याजदरात सुधारणा या व इतर आठ निर्णयांना आज झालेल्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये हदगावला जिल्हा व सत्र न्यायालय, सरकारी वकील कार्यालय यासाठी आवश्यक न्यायिक अधिकारी, कर्मचारीवृंद आणि खर्चाच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये समाजकार्य ही स्वतंत्र विद्याशाखा सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे.याशिवाय नवीन अभ्यासक्रम आणि अतिरिक्त तुकडी सुरू करता येणार आहे. समाजकार्य महाविद्यालयांनाही कायम विनाअनुदान तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम आणि अतिरिक्त तुकडी सुरू करण्याची मुभा देण्यात आली आहे.लातूर जिल्ह्यातील किल्लारी (ता. औसा) येथील श्री निळकँठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून भांडवली खर्च व खेळत्या भांडवलासाठी कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी स्थापन होणाऱ्या कंपन्यांच्या समूहातील किंवा विशेष वहन यंत्रणा कँपन्यांमधील अंतर्गत जमीन हस्तांतरणाच्या व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. कृषी विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देवून कृषी संचालक (कृषी अभियांत्रिकी, मालमत्ता व्यवस्थापन व ॲग्रीस्टॅक), कृषी सहसंचालक (सांख्यिकी), कृषी सहसंचालक (माहिती व तंत्रज्ञान) तसेच अपर संचालक, ॲग्रीस्टॅक (महसूल) या पदांचा समावेश आहे.स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खासगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याच्या नियमांमध्ये बदल करण्यासही मंजुरी देण्यात आली.

# नांदेड येथील उद्योग विभागाचे उपविभागीय कार्यालय बंद

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील उद्योग विभागाचे उपविभागीय कार्यालय बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यालयाचे सर्व कामकाज छत्रपती संभाजीनगर येथील सहआयुक्त उद्योग व सेवा या कार्यालयामार्फत होणार आहे.

उद्योग संचालनालयाचे नामकरण आता उद्योग आयुक्तालय असे करण्यात आले आहे. तसेच नांदेड येथील उपविभागीय कार्यालय बंद करण्यात आले असून, या कार्यालयाचे सर्व कामकाज सह आयुक्त (उद्योग व सेवा), छत्रपती संभाजीनगर विभाग, विकास भवन, दुसरा मजला, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहे. यापुढे नांदेड येथील उपविभागीय कार्यालयाशी संबंधित पत्रव्यवहार व कामकाजासाठी संबंधितांनी छत्रपती संभाजीनगर येथील सह आयुक्त (उद्योग व सेवा) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. यापुढे अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उपविभागीय कार्यालय, नांदेड या कार्यालयास करावयाच्या पत्रव्यवहाराबाबत झालेल्या या बदलाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा) अमोल इंगळे यांनी केले आहे.


# विडी कामगारांना किमान वेतन,थकीत व फरक तात्काळ देण्याचे कामगार मंत्र्यांचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील विडी कामगारांच्या थकीत किमान वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर राज्य सरकारने १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीतील महागाई भत्त्यासह सुधारित किमान वेतनाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश कामगार आयुक्तांना दिले आहेत. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे विडी कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विडी कामगारांच्या प्रलंबित वेतनाच्या प्रश्नावर विविध कामगार संघटना तसेच मालक संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांची दखल घेत मंत्री फुंडकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. तसेच विडी कामगारांच्या किमान वेतन दराच्या पुनर्निधारणाबाबत विधी व न्याय विभागाचा अभिप्राय मागविण्यात आला होता.या अभिप्रायात १० नोव्हेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे घोषित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर सध्या लागू असून, त्यांच्या अंमलबजावणीस कोणतीही कायदेशीर स्थगिती नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे सुधारित किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या पार्श्वभूमीवर सुधारित किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याबरोबरच वेतनातील फरकाची आणि थकीत रकमेची वसुली प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे गेल्या काही काळापासून प्रलंबित असलेल्या वेतनाच्या फरकाची रक्कम विडी कामगारांना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवीन वेतन निश्चितीनुसार, महापालिका हद्दीतील विडी कामगारांचा परिमंडळ-१ मध्ये दररोजचा किमान वेतनदर ३७९ रुपये राहणार आहे. यामध्ये २१० रुपये मूळ वेतन आणि १६९ रुपये महागाई भत्त्याचा समावेश आहे.तर महापालिका हद्द वगळता उर्वरित कार्यक्षेत्रातील परिमंडळ-२ मधील विडी कामगारांना दररोज ३६१ रुपये किमान वेतन देय राहील. पान ४ वर

# आठ वर्षांपासून गोकुंदा उड्डाणपूल कागदावरच; रेल्वे बोर्डाने उघड केला सा.बां.विभागाचा कारभार

## सुधारित आराखड्याअभावी काम ठप्प



किनवट/प्रतिनिधी-भोकर ते किनवट या राष्ट्रीय महामार्ग (क्र.१६१ ए) वरील रेल्वे फाटक क्र.११ च्या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्याचे भिजत घोंगडे सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासनाने मागील आठ वर्षांपासून ठेवले. तर दुसऱ्या बाजूने होत असलेल्या विलंबाबाबत अखेर रेल्वे बोर्डाने आपली भूमिका स्पष्ट करीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारित 'सामान्य व्यवस्था आरेख' वेळेत सादर न केल्यानेच हे काम रखडल्याचे रेल्वे बोर्डाने नमूद केले आहे.

आ.भीमराव केरामांनी दिल्ली येथील अनुसूचित जनजाती आयोग आणि दिल्लीतील केंद्रीय रेल्वे बोर्डाकडे प्रकरण लाऊन धरल्याने प्रशासकीय अनास्थेची लक्तरे चव्हाट्यावर आली आहेत. गोकुंदा रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाचा मुद्दा नेहमीच ऐरणीवर येतो पण केवळ तो चर्चेचाच विषय ठरत राहिला. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील उड्डाणपुलाच्या उदासिनतेची आठ वर्ष मागे पडलीत. दरम्यान आमदार केरामांनी आठ वर्षांच्या विलंबाबाबत रेल्वे बोर्डाकडे आणि राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडेही दाद मागितल्यानंतर उत्तरा दाखल भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाने ३१ जुलै २०२६ रोजी अधिकृत कार्यालयीन ज्ञापन जारी केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाची उदासिनता प्रकर्षाने समोर आली आहे. रेल्वे बोर्डाचे अधिकारी विवेक भूषण सूद यांनी आ.केराम यांना पाठवलेल्या पत्रानुसार ११ सप्टेंबर २०२४ रोजी रेल्वे व संबंधित विभागाची संयुक्त पाहणी झाली होती. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी रेल्वे प्रशासनाने काही अटी व टिपण्यांसह संकल्पनात्मक योजनेला मान्यता देऊन मंजुरीसाठी 'जीएडी' सादर करण्याचा सल्ला दिला होता. आता यापुढील कार्यवाहीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारित आराखडा मिळणे प्रलंबित आहे. तो दिल्या शिवाय उड्डाण पुलाच्या उभारणीचे श्रीफळ फुटणार नाही हे अगदी सूर्यप्रकाशा-एवढे सत्य आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग तातडीने सुधारित जीएडी सादर करून पुलाच्या कामाला गती देणार की पुन्हा कागदी घोडे नाचवणार हे पहाणे सुद्धा औचुक्याचे ठरणार ते पहायला मिळणार आहे.

# जिल्ह्यातील ४४ उमेदवार तीन वर्षांसाठी पालिका सदस्य होण्यास अपात्र

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील १२ नगरपरिषदा व एका नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये पार पडली. या निवडणुकीत उमेदवारांनी केलेल्या खर्चाचा विहित कालावधीत व विहित पद्धतीने हिशोब संबंधित कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक होते.

मात्र, निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व विहित पद्धतीने सादर न करणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील ४४ उमेदवारांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १६ (१ ड) अन्वये तीन वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य होण्यास अनर्ह ठरविण्यात आले आहे.याबाबतचे आदेश दि. २७ जुलै रोजी निर्गमित करण्यात आले असून, संबंधित उमेदवारांची नावे दि. ५ ऑगस्ट रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत.अनर्ह ठरविण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये उमरी न.प.६, भोकर न.प.२, लोहा न.प.१, हिमायतनगर न.पं.१४, धर्माबाद न.प.६, किनवट न.प.७, मुखेड न.प.३ आणि कँधार न.प.५ अशा एकूण ४४ उमेदवारांचा समावेश आहे.निवडणूक खर्चाचा हिशोब विहित वेळेत सादर करणे हे प्रत्येक उमेदवाराचे कायदेशीर कर्तव्य असून, त्याचे पालन न केल्यास कायद्यानुसार अपात्रतेची कारवाई होऊ शकते.

# 'जेन झी' विरोधात पुन्हा बळाचा वापर

दिल्लीत पेपरफुटीच्या प्रकरणावरून जंतर-मंतरवर उभे राहिलेले विद्यार्थी आंदोलन संपूर्ण देशाचे राजकारण ढवळून काढणारे ठरले. या आंदोलनाची धग केवळ दिल्लीपुरती मर्यादित राहिली नाही, तर तिचे पडसाद संसदेतही उमटले. गेल्या तीन आठवड्यांपासून संसदेचे कामकाज ठप्प राहणे, सरकारला बचावात्मक भूमिका घ्यावी लागणे आणि आंदोलनकर्त्यांच्या काही प्रमुख मागण्यांबाबत सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले जाणे, हे लोकशाहीतील जनआंदोलनाच्या ताकदीचे उदाहरण म्हणावे लागेल. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापासून आंदोलनाच्या काळात दाखल झालेल्या गुन्ह्यांवरील कारवाई मागे घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यापर्यंत अनेक घडामोडी घडल्या. नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपये देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. मात्र आश्वासन आणि प्रत्यक्ष मदत यामध्ये मोठे अंतर असते. त्यामुळे घोषणांपेक्षा अंमलबजावणी महत्त्वाची ठरते. दिल्लीतील आंदोलनाची सांगता झाली असली तरी त्यातून निर्माण झालेली अस्वस्थता अद्याप संपलेली नाही. उलट, देशातील तरुणाईच्या मनातील प्रश्न वेगवेगळ्या राज्यांमध्ये नव्या आंदोलनांच्या रूपाने समोर येत आहेत. झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन त्याच अस्वस्थतेचे पुढचे पान आहे. भरती परीक्षांमधील गैरव्यवहाराची सीबीआय चौकशी करावी, यासह विविध मागण्यांसाठी झारखंडमधील विद्यार्थी गेल्या काही दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. सुरुवातीला सत्याग्रह, धरणे आणि निदर्शने या लोकशाही मार्गांचा अवलंब करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विधानसभेवर मोर्चा काढला. अशा वेळी सरकारने आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करणे अपेक्षित होते. लोकशाही व्यवस्थेमध्ये आंदोलन करणे हा गुन्हा नाही. सरकारच्या निर्णयांविरोधात आवाज उठवणे, प्रश्न विचारणे आणि उत्तरांची मागणी करणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. विशेषतः विद्यार्थी आणि तरुणाई जेव्हा आपल्या भवितव्याशी संबंधित प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरते, तेव्हा त्यांचा आवाज अधिक संवेदनशीलतेने ऐकला गेला पाहिजे. कारण परीक्षा, भरती, रोजगार आणि पारदर्शकता हे त्यांच्या आयुष्याशी थेट जोडलेले प्रश्न आहेत. या प्रश्नांवर केवळ चर्चेचा देखावा करून भागणार नाही; ठोस निर्णय आणि त्याची वेळेत अंमलबजावणी करावी लागेल. झारखंड विधानसभेवरील मोर्चा दरम्यान विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्यात आला, पाण्याचे फवारे मारण्यात आले. दिल्ली, बिहार किंवा उत्तर प्रदेशातील काही आंदोलनांप्रमाणे पॅलेट गन अथवा अत्यंत घातक शस्त्रांचा वापर झालेला नसला, तरी लाठीमाराचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही. शांततापूर्ण मार्गाने आपले म्हणणे मांडणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलिसी बळाचा सामना करावा लागणे ही लोकशाहीसाठी निश्चितच चिंतेची बाब आहे.अलीकडच्या काळात 'सत्ता मस्तवाल झाली' अशी चर्चा वारंवार ऐकायला मिळते. मात्र आता प्रश्न त्यापेक्षाही गंभीर आहे. सत्ता मस्तवाल झाली आहे की, संपूर्ण व्यवस्था मस्तवाल होत चालली आहे? सत्ता कोणत्याही पक्षाची असो; प्रशासन, पोलीस आणि यंत्रणांनी सत्तेला कायद्याचा आणि लोकशाहीचा मार्ग दाखवणे अपेक्षित असते. परंतु जर प्रत्येक आंदोलनाकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहिले जाऊ लागले आणि संवादाऐवजी बळाचा वापर हा पहिला पर्याय ठरू लागला, तर लोकशाहीची मूळ भावना धोक्यात येते.विद्यार्थ्यांच्या हातात दगडाऐवजी पुस्तके, शस्त्राऐवजी प्रश्न आणि हिंसेऐवजी आंदोलनाची ताकद असते. त्यांच्या प्रश्नांना लाठीने उत्तर देणे म्हणजे प्रश्न संपवणे नव्हे; उलट त्या प्रश्नांना अधिक तीव्र बनवणे होय. आजच्या 'जेन झी' पिढीला गप्प बसवणे सोपे नाही. ती प्रश्न विचारते, माहिती मागते, पारदर्शकतेची अपेक्षा करते आणि आपल्या भवितव्याबाबत तडजोड करण्यास तयार नाही. म्हणूनच सरकारने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे शत्रू म्हणून नव्हे, तर लोकशाहीतील इशारा म्हणून पाहिले पाहिजे. परीक्षा आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकता, गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि आंदोलनकर्त्यांशी संवाद, हीच लोकशाहीची खरी दिशा आहे. लाठीमाराने रस्ते रिकामे होतील; पण विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न संपणार नाहीत. सत्तेने हे वेळीच ओळखले नाही, तर आजचा लाठीमार उद्याच्या अधिक मोठ्या असंतोषाचे कारण ठरू शकतो. लोकशाहीची ताकद दडपशाहीत नाही, तर संवादात आहे. त्यामुळे 'जेन झी' विरोधात पुन्हा बळाचा वापर करण्याऐवजी तिचे प्रश्न ऐकण्याची आणि सोडवण्याची वेळ आता आली आहे.

# भ्रष्टाचार, भेसळ आणि बेरोजगारी; मग परिसीमनाची एवढी घाई कशासाठी?

**रमेश लांजेवार**
नागपूर



फक्त राजकारणासाठी व स्वतःच्या स्वार्थासाठी आरोग्याशी खेळ खेळू नये.सर्वप्रथम देशाच्या जनतेच्या भविष्याचा व आरोग्याचा विचार सरकारने करावा. नंतर राजकारणाचा विचार करावा.आरोग्य हिच संपत्ती असे म्हटल्या जाते परंतु यावरच सरकारकडून घणाघाती प्रहार होत आहे.कारण आज देशात सर्वच वस्तूमध्ये व पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याचे दिसून येते आणि याचा सरळ परिणाम देशातील जनतेच्या आरोग्यावर होत आहे या संपूर्ण घटना सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.देशात लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, महानगरपालिका सदस्य, सरपंच इत्यादी अनेक लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी देशासह राज्यात, ग्रामीण भागात,शहरी भागात आहेत व यांच्या सोबतीला सरकारी यंत्रणा म्हणून मोठ्या प्रशासनाची साथ असतांना व राजकारण्यांचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची गरजच काय? देशात लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा नाही, विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात हॉस्पिटल नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या नाहीत, लोकसंख्या प्रमाणात नागरी सुविधा नाहीत.परंतु राजकीय पुढाऱ्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आमदार, खासदार,मंत्री पाहिजे ही कसली लोकशाही म्हणावी!याला तर हुकूमशाही म्हणावी लागेल.

देशात अनेक ज्वलंत, गंभीर आणि जटील समस्या आहेत व ते प्रत्येक माणसाच्या आरोग्याशी निगडित आहेत.ह्या संपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर असतांना सुध्दा सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना फक्त आपले स्वार्थ साधण्यासाठी परिसीमन वाढविण्यावर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. आज आरोग्याशी निगडित अनेक गंभीर समस्या देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे आहेत.आपण देशातील दुध उत्पादनाचा विचार केला तर दररोज देशात १४ कोटी लिटर दुधाचे संकलन होते.परंतु देशात दूधाचा खप दररोजचा ६४ कोटी लिटर होतो.म्हणजे देशात ५० कोटी लिटर दूध आले कोठून याची सरकारने कधीच चौकशी केली नाही आणि चौकशी करण्याला महत्त्व सुध्दा दिले नाही.परंतू मतदारसंघ पुनर्रचना करण्यासाठी व महिला आरक्षणासाठी सरकारकडून एडीचोटीचा जोर लावण्यात येत असून प्रयत्न सुरू आहे.आज ८० टक्के दूधाचा वापर मुलांच्या आहाराच्या रूपात वापरल्या जातो आणि प्रत्येक आईवडील आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी दूधाचा वापर करतोच.देशात विकल्या जाणाऱ्या दुधाचा विचार केला तर ८० टक्के दूध बालकांच्या आहारात वापरल्या जाते व २० टक्के दूधाचा वापर सर्वसामान्यांनसाठी केला जातो.यावरून आपण समजू शकतो की, लहान मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे.दूधातील भेसळ म्हणजे देशातील बालक,आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल.कारण दूधापासून शेकडो पदार्थ तयार होतात आणि एवढे दुध येतेच कोठून असा प्रश्न आज जनतेसमोर उपस्थित होत आहे.राजकीय पुढारी आपल्या स्वार्थासाठी मतदार संघ फेररचना करून राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या तयारीत आहे.सध्या देशात ५४३ लोकसभा सदस्य आहेत यात फेररचना करून ८५० करण्याच्या तयारीत सत्ताधारी पक्ष आहेत.सरकार महिलांना ५४३ संसद सदस्यामध्ये आरक्षण देण्यास तयार नाही.परंतु मतदार संघ वाढवून महिला आरक्षण देण्यावर जास्त भर देत आहे. याकरीता सरकार फोडाफोडीचे राजकारण करू बहुमताचा आकडा तयार करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी सरकार प्रयत्न करीत आहे.विधेयक पारीत करण्यासाठी सध्याच्या ५४३ खासदारांच्या संख्याबळानुसार दोन तृतीयांश म्हणजे सरकारला लोकसभेत ३६० खासदारांची गरज आहे, सध्या राज्यसभेत २४५ खासदार आहेत बहुमतासाठी राज्यसभेत १६४ सांसद सदस्यांची गरज आहे.परंतु आज देशाला मतदारसंघ पुनर्रचना करण्याची काहीच गरज नाही. कारण देशात पुर्वीपासूनच लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधीं व सरकारचा प्रशासकीय मोठा जखीडा आहे. त्यामुळे राजकारणाचा व प्रशासनाचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची तिळमात्र गरजेचं नाही.जर मतदारसंघाची पुनर्रचना झाली तर देशाच्या १४५ कोटी जनतेवर अरबो रूपयांचा बोजा पडेल व हा संपूर्ण पैसा राजकीय पुढाऱ्यांच्या घशात जाईल.आज भेसळयुक्त पदार्थाने देशाच्या १४५ जनतेचे आरोग्य धोकादायक स्थितीत आले आहे.यामुळे देशाच्या जनतेला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. आज भेसळयुक्त पदार्थ किंवा वस्तू यांचा जनुकाय खुला बाजार मांडला की असे दिसून येते.आज महाराष्ट्रातील भेसळयुक्त पदार्थ किंवा अन्नधान्य यावर माननीय श्री तुकाराम मुंढे यांनी धाडी टाकून व कठोर कारवाई करून भेसळ करणाऱ्यांची झोप उडविली आहे आणि आज तुकाराम मुंढेमुळे देशातील अनेक राज्य सरकारांना जाग आल्याचे दिसून येते. ह्या घटना अगोदरच सरकारच्या कशा काय लक्षात आल्या नाहीत? असे अनेक प्रश्न आज १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होतात.यावरून आपण समजू शकतो की, मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे याचा अंदाज आपण लावू शकतो. दूधातील भेसळ म्हणजे देशातील मुलं, आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल. रोज सकाळी उठल्यावर आपण जे दूध पितो ते शुद्ध आहे की भेसळयुक्त? याची खातरजमा खरं तर कुणीच करत नाही. मात्र या दुधात भेसळ असण्याची शक्यताच जास्त आहे. कारण देशात उत्पादित होणाऱ्या दुधाच्या चौपट प्रमाणात विक्री केली जाते. आपल्या देशात दररोज १४ कोटी लिटर दुधाचं उत्पादन होतं.परंतू देशात ६४ कोटी लिटर दूध रोज विकलं जात असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. देशात रोज अंदाजे ५० कोटी लिटर भेसळयुक्त दूध विकलं जातं, असा दावा निमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाचे सदस्य मोहनसिंग अहलुवालिया यांनी केला आहे. देशातील ६८.७ टक्के दूध हे अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या निकषांवर नापास झालं आहे. डिसेंबर २०१६ मध्ये सुप्रीम कोर्टाने केंद्राला दूध भेसळीची तातडीने चौकशी करण्याचे आदेश दिला होता. त्यावर सरकारने अर्थमंत्री अरुण जेटलींच्या अध्यक्षतेखाली समिती सुध्दा नेमण्यात आली होती. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या समितीची एकही बैठक झाली नसल्याचे सांगितले जाते आणि आतातर यावर सरकार लक्ष देण्यास नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल.दुग्धजन्य पदार्थांच्या बाबतीत ऐवढी भेसळ होत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही.आपण सरासरी विचार केला तर सर्वसाधारण १ लिटर फुल क्रीम दूधापासून खवा साधारणता २०० ग्रॅमच्या जवळपास तयार होतो.त्याचप्रमाणे पनीरचा विचार केला तर साधारणतः १ लिटर फुल क्रीम (म्हशीच्या) दुधापासून साधारणपणे १५० ते २०० ग्रॅम पनीर तयार होते.परंतु यांच्या तुलनेत ५० पटीने खवा व पनीर आपल्याला बाजारात दिसून येते.देशात दररोज ५५ लाख कीलो खवा तयार होतो तर दररोज १ कोटी ५० लाख किलो पनीरचे वापर आणि उत्पादन केले जाते. म्हणजे आपल्याजवळ जेवढे दूध नाही त्याच्या कितीतरी पटीने देशात खवा आणि पनीरचे उत्पादन केल्या जाते याचाच अर्थ असा की, देशात दूध,पनीर,खवा आणि दुधापासून तयार होणारे पदार्थ यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत आहे आणि सरकारने डोळ्यावर पट्टी बांधून ठेवली आहे.यावरून लक्षात येते की, सरकार सर्वसामान्यांच्या आहाराकडे व आरोग्याकडे लक्ष न देता परिसीमनवर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. देशात सर्वच बाबतीत भेसळचे प्रमाण वाढले आहे आणि विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचार केला तर जंकफूडमुळे त्यांचे आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.यामुळे नवीन-नवीन आजार उदयास येत आहे यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता भ्रष्टाचार,महागाई, बेरोजगारी, पेपर फुटी,जेन-झी चे प्रश्न, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां,शैक्षणिक धोरण, बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली पुरपरिस्थिती अशा गंभीर समस्या देशापुढे असतांना सध्याच देशाला मतदारसंघ पुनर्रचनेची गरज नसून एक सूदृढ,निरोगी आणि भ्रष्टव्यवस्था मुक्त करण्याची गरज आहे.त्यासाठी सरकारने,पक्ष-विपक्षांनी एकत्र येऊन काम करण्याची नितांत गरज आहे.जय हिंद!

# अहिल्यादेवींच्या तेराव्या वंशजांनी घेतले माहूरगडावर दर्शन

## होळकर समाज बांधवांकडून भूषणसिंह होळकर यांचा शासकीय विश्रामगृहात सत्कार



माहूर/प्रतिनिधी- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तेराव्या वंशजांचे तसेच ऐतिहासिक होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंह होळकर यांनी रविवारी श्रीक्षेत्र माहूरगड येथे भेट देत आई श्री रेणुका माता आणि भगवान दत्तात्रेयचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांच्या आगमनामुळे माहूर परिसरातील होळकर समाज बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी माहूर तालुका व परिसरातील समाज बांधवांच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे भूषणसिंह होळकर यांचा पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला.

भूषणसिंह होळकर यांनी सर्वप्रथम श्री रेणुका माता मंदिरात जाऊन आई रेणुका मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिराचे पुजारी शुभम भोपी, सुरक्षा अधिकारी महादेव मुंडे, विश्वस्त मंडळी व मंदिर कर्मचारी उपस्थित होते. मंदिर प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी श्रीक्षेत्र दत्तशिखर येथे जाऊन भगवान दत्तात्रेय महाराजांचे दर्शन घेतले. दत्त महाराजांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी आशीर्वाद घेतला. माहूरगडची पवित्र भूमी, येथील धार्मिक वातावरण आणि भाविकांची श्रद्धा मनाला भावली असून रेणुका माता व दत्त महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर मनाला विशेष समाधान व नवचैतन्य मिळाल्याची भावना भूषणसिंह होळकर यांनी व्यक्त केली. भविष्यात पुन्हा माहूरगडला दर्शनासाठी येण्याची इच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.भूषणसिंह होळकर यांच्या माहूर भेटीची माहिती मिळताच होळकर समाज बांधवांनी शासकीय विश्रामगृहात मोठ्या संख्येने उपस्थित राहत त्यांचे स्वागत केले. ऐतिहासिक होळकर घराण्याच्या वंशजांची प्रत्यक्ष भेट आणि संवाद साधण्याची संधी मिळाल्याने समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजसेवा, लोककल्याण तसेच धार्मिक स्थळांच्या विकासातून निर्माण केलेली प्रेरणादायी परंपरा आजही समाजासाठी मार्गदर्शक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.यावेळी माजी पंचायत समिती सभापती विलास गावंडे, धनगर समाज समितीचे माहूर तालुकाध्यक्ष राजू सौंदलकर, काँग्रेस नेते भगवानराव खंडागळे (पुसद), ढानकी नगरपंचायतीचे भाजपा गटनेते मल्हारभाऊ चंद्रे, कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटचे संचालक बालाजी बामणे, संतोष गंधे, कैलास महले, डॉ. धनराज गावंडे, बळीराम डूरके, अक्षय डूरके यांच्यासह माहूर तालुका व परिसरातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेटी बचाव,बेटी पढावचा कंधारमध्ये जागर:मुलींच्या शिक्षणासाठी जनजागृती



कंधार/प्रतिनिधी-मुलगी वाचवा, मुलगी शिकवा आणि तिला आत्मनिर्भर बनवा असा संदेश देत बेटी बचाव, बेटी पढाव महाराष्ट्र राज्य जनजागृती अभियानांतर्गत कंधार येथे मुलींच्या शिक्षणासह विविध सामाजिक विषयांवर प्रभावी प्रबोधन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या कृष्णाई संभाजी इंगळे (रा. सातेगाव, ता. पालम, जि. परभणी) यांनी दि. १० ऑगस्ट रोजी कंधार येथील महात्मा फुले प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना लेक शिकवा या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी बेटी बचाव, लेक वाचवा, टिकवा व शिकवा, शौचालय व स्वच्छतेचे महत्त्व, आरोग्य व सुरक्षितता, झाडे लावा, झाडे जगवा, सर्वांसाठी शिक्षण, मुलींच्या शिक्षणावर बंधने का असू नयेत, तसेच मुलगा आणि मुलगी यांच्यातील समानतेचे महत्त्व या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मुलगा वंशाचा दिवा असेल तर मुलगीही वंशाची पणती आहे, असा संदेश देत मुलींना समान हक्क, समान संधी आणि शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. मुलींना ५० टक्के हक्क व आरक्षण याबाबतही त्यांनी माहिती दिली. तसेच हुंडा घेणार नाही आणि आपल्या बहिणीला हुंडा देणार नाही, अशी सामाजिक जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन आपली टक्केवारी वाढवावी, शिक्षणापासून एकही विद्यार्थी वंचित राहू नये, यासाठी शाळा आणि गावाने एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहनही कृष्णाई इंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे, आनंदा आगलावे व वैजनाथ जाधव यांच्या हस्ते सामाजिक कार्यकर्त्या कृष्णाई संभाजी इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. या जनजागृती कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मुलींच्या शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन, समानतेची भावना आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

सायं दैनिक
नांदेड वार्ता
मंगळवार, दिनांकः ११ ऑगस्ट २०२६


# आशा कार्यकर्तीचा न्यायासाठी एल्गार; १३ ऑगस्टपासून आमरण उपोषण

किनवट/प्रतिनिधी- जलधरा प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधांतरीच सेवामुक्त केलेल्या आशा कार्यकर्ती सौ.रेणुका श्रीराम पाचपुते यांनी शेवटचा पर्याय म्हणून आता न्याय मागणी घेऊन दिल्ली स्थित राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे दाद मागितली आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी केलेल्या अन्यायकारक कारवाईमुळे फेरविचार करुन पुर्ववत सेवेत कायम करून घेण्यासाठी १३ ऑगस्ट पासून तालुका आरोग्य अधिकारी यांच्याच कार्यालयासमोर न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषण छेडण्याचा गर्भीत इशारा दिला आहे. या टोकाच्या भूमिकेमुळे काय काय घडामोडी घडतील ते किनवटकरांना पहायला मिळणार आहे.

उत्पीड़ीत सौ.रेणुका पाचपुते यांची १५ ऑक्टोबर २०२४ रोजी शासकीय आदेशानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र जलधरा येथे रितसर नियुक्ती झाली होती. निष्ठापूर्वक सेवा बजावून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सुद्धा अचानक तोंडी आदेश देऊन कामावरून काढून टाकल्याची धक्कादायक घटना घडल्यामुळे तेव्हा पासून सौ.रेणुका पाचपुते न्यायाच्या प्रतीक्षेत वनवन भटकताना दिसतात. 'तीन अपत्य' असल्याच्या




सबबीखाली सौ.पाचपुते यांना सेवेतून बाहेर केले. भरती दरम्यान प्रत्येक प्रमाणपत्रांसह कागदपत्रे तपासली होती की नाही ? असा प्रश्न निर्माण होतो. मुळात हे तिन्ही अपत्य २३ जुलै २०२० च्या शासन परिपत्रकाच्या कितीतरी वर्ष अगोदर जन्मलेली असल्याचा जिताजागता पुरावा दिलेला असतांना सुद्धा तो मोडीत काढून जाणीवपूर्वक सेवेतून काढचाचा सौ.पाचपुतेंचा आरोप आहे. मग सौ.पाचपुतेंच्या रिक्त जागेवर किती अपत्य असलेल्या उमेदवाराला सेवेत सामावून घेतले? असा त्यांचा सवाल आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेतील कार्यरतांच्या अपत्यांचाही प्रश्न त्यांनी ऐरणीवर आणणे स्वाभाविक आहे. २३ जुलै २०२० पुर्वी आणि नंतरच्या दोनपेक्षा जास्त अपत्य असलेल्यांची तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी कधी पडताळणी केली की, जाणीवपूर्वक एकट्या सौ.पाचपुतेंनाच लक्ष केले? असा प्रश्न या निमित्ताने सर्व स्तरातून समोर येतांना दिसतो.

प्राप्त निवेदनानुसार कोणत्याही नोटीसशिवाय बेकायदेशीरपणे कामावरून कमी केल्यामुळे पुनश्च आशा कार्यकर्तीपदावर पूर्ववत कायम सामाऊन घ्यावे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी सेवाशिस्तभंग करुन पदाचा दुरुपयोग तर केला नाहीना? याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. कामावरून कमी केलेल्या संपूर्ण कालावधी दरम्यानचे थकीत मानधन/वेतन त्वरित अदा करण्यात यावे. अशा आशयाच्या मागण्या घेऊन बेमुदत आमरण उपोषणाला बसणार आहेत. तर सबळ पुराव्याशिवाय गरीब महिलेला हक्काच्या नोकरीपासून वंचित केल्या प्रकरणी मनमर्जी प्रशासन चालविणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी यासाठी सौ.पाचपुतेंनी आता दिल्लीतल्या राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे दाद मागितली आहे. तर दुसरीकडे न्यायासाठी १३ ऑगस्ट पासून तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयासमोरच बेमुदत आमरण उपोषणाला सौ.पाचपुते बसणार आहेत. तालुका आरोग्य अधिकारी विरुद्ध उत्पीडीत सौ.पाचपुते यांच्यातील उद्धवलेल्या प्रकरणाची चौकशी झाल्याशिवाय सत्यता समोर येऊन कोण दोषी आणि निर्दोष हे वास्तव समोर येणार नसल्याच्या लोकप्रतिक्रिया सुद्धा उमटू लागल्या आहेत.

## बारा गोवंशाची पोलीसांनी केली सुटका

नांदेड/प्रतिनिधी-अर्धापूर शहरातील करीम कॉलनी येथे पोलीसांनी धाड टाकुन बारा गोवंशाची सुटका केली आहे.

करीम कॉलनी भागात एका टिनशेडमध्ये गोवंश कत्तलीसाठी बांधुन ठेवल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक महादेव मांजरमकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी करीम कॉलनी येथे धाड टाकली. टिनशेडमध्ये बांधुन ठेवलेली ९ गोवंश तसेच महेंद्रा पिकअप वाहनामध्ये दाटीवाटीने बांधुन ठेवलेले ३ गोवंश पोलीसांना आढळून आले. पोलीसांनी १२ गोवंश व महिंद्रा पिकअप वाहन जप्त केले. याप्रकरणी चार जणांविरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चार लाखांचा गुटखा पोलीसांनी केला जप्त

नांदेड/प्रतिनिधी-शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटख्याची तस्करी करणारी कार स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी सोमवारी पकडली असून पोलीसांनी चार लाख रुपयांचा गुटखा व कार असा १४ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचारी हे सोमवारी शहरात गस्त घालीत असतांना त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार एका इनोव्हा कारमधून गुटख्याची तस्करी होत आहे. पोलीसांनी असर्जन ते लातुरफाटा मार्गावर सापळा रचून इनोव्हा कार क्र.एमएच १२ आर.आर.४५३६ ही कार थांबवीली. पोलीसांनी सदरील कारची तपासणी केली असता कारमध्ये शासनाने बंदी घातलेल्या विविध कंपनीचा ४ लाख रुपयांचा गुटखा पोलीसांना आढळून आला. पोलीसांनी गुटखा व कार असा १४ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. कार चालक शेख तौफीक शेख रफीक, शेख फाजील शेख अफजल, शेख अनिस शेख चाँद सर्व रा.पूर्णा यांना अटक केली आहे.

# पावडेवाडी येथे सौ.संगीताताई पाटील डक यांचा भव्य सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमध्ये प्रचंड मतांनी दणदणीत विजय मिळवल्याबद्दल जिल्हा बँकेच्या नूतन संचालिका सौ .संगीताताई विठ्ठल पाटील डक यांचा पावडेवाडी सेवा सोसायटी व ग्रामपंचायत कार्यालय आणि गावकऱ्यांच्या वतीने भव्य असा सत्कार दि.१० ऑक्टोबर रोजी करण्यात आला. यावेळी नूतन संचालिका सौ.डक यांनी निवडून दिल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले तसेच जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नांदेड तालुक्यातील पावडेवाडी येथे नांदेड जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. संगीताताई विठ्ठल पाटील डक यांचा शाल श्रीफळ आणि मोठ्या हराने सत्कार केला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी माधवराव पावडे, पंचायत समितीचे माजी सभापती बंडू भाऊराव पावडे, उपसरपंच बंडू पावडे, पावडेवाडी सेवा सोसायटीचे चेअरमन दादाराव पावडे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पावडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, बाबुराव पावडे, ज्ञानोबा माळकरी, पांडुरंग पावडे, सेवा सोसायटीचे संचालक प्रल्हाद पावडे, माधव तात्या, नवनाथ पावडे, विलास पावडे, व्यंकट पावडे, तसेच संजय कारभारी, दादाराव पावडे, ज्ञानबा पावडे, गुलाबराव पावडे, योगेश पावडे, राजकुमार पावडे, तानाजी पावडे, साईनाथ पावडे, शिवाजी पावडे, सदाशिव पावडे, देवराव पावडे, बाबुराव पावडे, काशिनाथ पावडे, नारायण पावडे, गोविंदराव पावडे, भगवान पावडे, भगवानराव हंबर्डे, विलास पावडे, गंगाधर होळ पाण, सुनील पावडे, शांतनू पावडे, चेअरमन शंकर शिंदे, वैजनाथ सूर्यवंशी, एकनाथ जोगदंड, बालाजी जाधव, तूगाव



येथील माधव भोसले, कुंडलिकराव बोकारे, बालाजी डुकरे, पुरभाजी कळके, ज्ञानेश्वर शिंदे, विष्णू पाटील, अनिल पुयड, साई महाजन, शहाजी भोसले, शुभम सावंत, युवराज दळवे, संतोष माने, प्रकाश भोसले, गंगाधर भोसले, माधव मोरे, रामभाऊ पावडे, पांडुरंग पावडे, गोविंद मामा सूर्यवंशी, आबाराव पावडे, पंडित पावडे, साहेबराव पावडे, तानाजी पावडे, व्यंकट पावडे यावेळीआदि जणांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी किसान सभेचा भव्य मोर्चा

माहूर/प्रतिनिधी-शेतकरी, पेसा मोबिलायझर, बांधकाम कामगार आणि दिव्यांगांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने सोमवारी (दि.१०) विज वितरण कार्यालयापासून तहसील कार्यालयाच्या दिशेने भव्य मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात सुमारे आठशे ते नऊशे शेतकरी व पेसा मोबिलायझर सहभागी झाले होते. मोर्चाचे नेतृत्व कॉ.शंकर सिडाम, कॉ.किशोर पवार, कॉ.डॉ.बाबा डाखोरे, प्रेमसिंग चव्हाण, गणेश जाधव, किसन जगदाळे आणि भारत वाढगुरे यांनी केले.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, गतवर्षी कापूस पीक न झालेल्या शेतकऱ्यांनाही कापूस पीक विम्याचा लाभ द्यावा, सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. याशिवाय चिमटा धरण (निम्न पैनगंगा प्रकल्प) चे काम तातडीने बंद करून माथा ते पायथा बॅरेजेस बांधावेत, बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी ग्रामसेवकांकडून तातडीने ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्यात यावे, पेसा मोबिलायझर यांना सरकारी सेवेत सामावून घ्यावे आणि दिव्यांगांना दरमहा पाच हजार रुपये मानधन देण्यात यावे, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या. मोर्चा दरम्यान विविध मागण्यांच्या घोषणा देत आंदोलकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. शेतकरी व ग्रामीण भागातील विविध घटकांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. आंदोलन यशस्वी करण्यासाठी तालुका कमिटी सदस्य कॉ.राजू पिसरवाड, कॉ.कादरखान, कॉ. शंकर गंधमवार, कॉ.दिगंबर आगिरकर, कॉ.गांगजी मेश्राम, कॉ. विनोद डाखोरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# बारडमध्ये बिबट्याने पाडला पाच शेळ्यांचा पडसा

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यातील बारड येथील लहुजी नगर परिसरात बिबट्याने मध्यरात्री धुमाकूळ घालत माणिक कांबळे या शेतकऱ्याच्या पाच शेळ्यांवर हल्ला करून त्यांना ठार केल्याची थरारक घटना ९ ऑगस्टच्या मध्यरात्री घडली आहे.

माणिक नारायण कांबळे यांनी आपल्या घरासमोर पाच शेळ्या बांधल्या होत्या.९ ऑगस्टच्या मध्यरात्री सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक या शेळ्यांवर हल्ला चढवला.या दुर्दैवी घटनेत पाचही शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला. आजच्या महागाईच्या काळात शेळ्यांचा बळी गेल्याने कांबळे यांचे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.घटना घडल्याचे समजताच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बारडकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी या घटनेची माहिती वन विभाग व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली. अधिकाऱ्यांनी त्वरित घटनास्थळी येऊन पंचनामा करावा आणि पीडित शेतकरी माणिक कांबळे यांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी जोरदार मागणी बारडकर यांनी केली आहे. मुदखेड तालुक्यातील बारड, निवघा, डोंगरगाव, पार्डी वैजापूर राजवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतात किंवा आखाड्यावर बांधलेली जनावरे, वासरे आणि पाळीव कुत्र्यांवर बिबट्यांचे हल्ले होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. बिबट्याच्या वाढत्या दहशतीमुळे शेतकरी आणि ग्रामस्थ प्रचंड चिंतेत आहेत. बिबट्याच्या भीतीपोटी शेतात किंवा आखाड्यावर राखणीसाठी



'सालगडी' (शेतमजूर) राहण्यास तयार नाहीत. त्यामुळे वन विभागाने या बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करून त्यांना पकडून मोठ्या जंगलात सोडावे, अशी उद्विग्न मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ११२५/२०२६
दिलीप व ईतर वि. निरंक
ने. ता. २१/०९/२०२६

अर्जदार:- १. दिलीप पि.किशनराव साळवे, वय : ४९ वर्षे, धंदा : मजुरी, २. आरती पि.दिलीप साळवे, वय : ३३ वर्षे, धंदा : घरकाम, ३. विजय पि.दिलीप साळवे, वय : ३० वर्षे, धंदा : शिक्षण, सर्व रा.कल्याण नगर, तरोडा बु.ता.जि.नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत कांताबाई भ्र.दिलीप साळवे यांचा मृत्यु दिनांक २५/०९/२०१६ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ हे मयताचे पती असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी व अर्जदार क्र. ३ हा मुलगा आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ३ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २१/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# महारक्तदान शिबीरात ३२३ रक्तदात्यांचे रक्तदान

उमरी/प्रतिनिधी-लोकनेते, माजी आमदार कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या जयंतीनिमित्त कैलासभाऊ देशमुख गोरठेकर मित्र मंडळाच्या वतीने उमरी नगरपालिका चौक येथे ९ ऑगस्ट रोजी भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल ३२३ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

शिबिरात युवकांसह महिला तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत करण्याचा संदेश देत नागरिकांनी सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडविले. दरम्यान, कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या जयंतीनिमित्त बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी येथे भव्य महाआरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या समाजसेवेचा वारसा पुढे नेत सामाजिक आणि आरोग्यविषयक विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनसेवा करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रम, महारक्तदान शिबिर आणि महाआरोग्य शिबिराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या कार्यावरील जनतेच्या प्रेमाचे प्रतीक असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

## सौ.संगिता व्यंकट मोकले यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य व्यंकटराव मोकले यांच्या पत्नी सौ. संगिता व्यंकटराव मोकले यांचे पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये दीर्घ आजाराने उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५४ वर्षे होते.



त्यांच्या पश्चात पती व्यंकटराव मोकले, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.सौ. संगिता मोकले यांच्या नाईकनगर, नांदेडच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार असून त्यांच्यावर बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ९. वाजता शांतिधाम, गोवर्धन घाट, नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# मरवाळी येथे महिलांसाठी दोन दिवसीय सेंद्रिय शेती प्रशिक्षण

नायगाव/प्रतिनिधी- नायगाव तालुक्यातील मरवाळी येथे सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या पुढाकारातून आणि अंजना माधव चितले यांच्या विशेष प्रयत्नातून महिला शेतकऱ्यांसाठी दोन दिवसीय सेंद्रिय शेती प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या प्रशिक्षणाला परिसरातील महिला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रासायनिक शेतीवरील वाढता खर्च कमी करून सेंद्रिय पद्धतीने कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी महिलांना सक्षम करणे, हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी महिलांना जीवामृत, घनजीवामृत, दशपर्णी अर्क यांसारख्या सेंद्रिय निविष्ठा घरच्या घरी कमी खर्चात तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.



तसेच जमिनीचे आरोग्य टिकविणे, पाणी बचत, पिकांची फेरपालट आणि सेंद्रिय पद्धतीने शेती करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.शेतीसोबत शेळी-मेंढी पालन, गाय-म्हैस संगोपन व कोंबडी पालन यांसारखे जोडधंदे केल्यास कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते, याबाबतही महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. गोमूत्र व शेणाचा सेंद्रिय निविष्ठा व खत निर्मितीसाठी उपयोग कसा करता येतो, याची माहिती देण्यात आली.रासायनिक फवारणीचे संभाव्य दुष्परिणाम, सेंद्रिय अन्नाचे महत्त्व आणि कुटुंबाच्या आरोग्यासाठी विषमुक्त अन्नाची गरज यावरही मार्गदर्शन करण्यात आले. विषमुक्त अन्न खा, आरोग्यदायी जीवन जगा हा संदेश यावेळी देण्यात आला. प्रशिक्षणानंतर महिलांनी सेंद्रिय निविष्ठा स्वतः तयार करून शेतीत वापरण्याचा तसेच शेतीपूरक व्यवसाय वाढविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# स्थानिकांनी लाल फडकं दाखवलं पण,रेल्वे थांबलीच नाही

## पूर्णा येथील धक्कादायक घटना

परभणी:मुंबईच्या लोकल ट्रेनमधून पडून जीव गेल्याच्या घटना सातत्याने घडतात, मुंबईकरांना रेल्वे अपघात नवीन नाहीत. मात्र, मुंबईतील प्रवाशांच्या सुरक्षेसासाठी रेल्वे विभागाकडून सातत्याने पाऊले उचलली जातात. तरीही लोकल रेल्वेतील अपघाताच्या घटना थांबत नाहीत. उर्वरीत मार्गावरही रेल्वेकडून फाटक आणि इतर सुविधांसह खबरदारी घेतली जाते. मात्र, परभणीच्या पूर्णा रेल्वे स्थानकाजवळी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील रेल्वे स्थानकावर एका युवकाचा मृतदेह आढळून आला, त्यामुळे स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित यंत्रणेला कळवले. दरम्यान, येथून त्याचवेळेस जात असलेल्या रेल्वेला थांबण्यासाठी लाल फडके दाखवण्यात आले. मात्र, रेल्वे न थांबता तशीच मृतदेहाच्या वरुन निघून गेली.

परभणीच्या पूर्णा रेल्वे स्थानकाजवळ आज सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास गणेश बालाजी नावाच्या २८ वर्षीय तरुणाचा मृतदेह पूर्णा नदीवरील पुलावर असलेल्या रेल्वे रुळावर पडलेला होता. याबाबत लोको पायलट यांनी रेल्वे पोलिसांना माहिती दिली, याच दरम्यान एक दुसरी रेल्वे या रुळावरून जात होती. त्यामुळे, काही स्थानिक तरुण हातात लाल कापड घेवून ती रेल्वे थांबवण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, रेल्वे थांबली नाही आणि चक्क रेल्वे रुळावर मृतदेह पडला असताना रेल्वे त्याच रुळावरून पुढे गेली.शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी याबाबतचा व्हिडिओ ट्विटरुनवरुन शेअर केला आहे.

# देगलूर तालुक्यात आंतर मशागतीला वेग:यंदा मजुरीही २५ टक्क्यांनी वाढली



देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यात खरीप हंगामातील पिकांची आंतर मशागत सुरू झाली असतानाच बैल जोडी आणि मजुरांचीही उणीव निर्माण झाली आहे. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या असून, मशागतीच्या खर्चातही मोठी वाढ झाली आहे.

सध्या बैल जोडीसह मालकाकडून एक एकर कपाशीची वखरणी करून देण्यासाठी तीन हजार रुपये आकारले जात असून, मजुरीही २५ टक्क्यांनी वाढली आहे. पिकामध्ये वाढलेले गवत काढण्यासाठी कोळपणी, खुरपणी, निंदनी यासह इतर आंतर मशागतीची कामे करणे आवश्यक आहे. त्यातच वेळेवर मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. देगलूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये महिला मजुरांची मागणी वाढली आहे. अधिकचे पैसे देण्याची तयारी दर्शवुणही महिला मजूर उपलब्ध होत नसल्याची स्थिती आहे. काही महिला मजुरांनी मशागतीच्या कामासाठी शेतकऱ्याकडून आगाऊ रक्कम घेतल्याचेही सांगण्यात येत आहे.

मजुरांचा तुटवडा आणि वाढलेले दर यामुळे अनेक शेतामध्ये वेळेवर आंतर मशागत होऊ शकली नाही. परिणामी कपाशीच्या पिकात गवताचे प्रमाण वाढत आहे. गवतामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. मजूर उपलब्ध होत नसल्याने काही शेतकरी गवत नियंत्रणासाठी तन नाशक औषधांचा वापर करीत आहेत. एकीकडे उत्पादन खर्च वाढत असताना दुसरीकडे मशागतीचे वाढते दर आणि मजुरांची कमतरता यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. पिकांची वेळेवर मशागत होण्यासाठी मजूर आणि बैल जोडी उपलब्ध होणे गरजेचे असल्याने प्रशासनाने या समस्येकडे लक्ष द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. ४०० रुपये मजुरी देऊनही शेतकऱ्यांना वेळेवर मजूर मिळत नसल्यामुळे घरोघरी जाऊन भटकंती करावी लागत आहे. यंदा शेतमजुरीची कामे वाढली आहेत. आम्ही शेतकऱ्याकडून आधीच पैसे घेतले आहेत; मात्र एकाच वेळी अनेक ठिकाणी कामे असल्याने मजुरीचे शिल्लक पैसे देऊनही काही शेतकऱ्याकडे कामाला जाता येत नाही. अशी प्रतिक्रिया लोणी ता.देगलूर येथील शेत मजुरांनी व्यक्त केली आहे.




सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथे आज (मंगळवार) संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले. सदरील बैठकीस सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे कर्ज माफ होताच,नवीन पीक कर्जाचे दरवाजे उघडले

धर्माबाद/प्रतिनिधी-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली असून थकीत कर्जमुक्ती मिळालेल्या धर्माबाद तालुक्यातील ४ हजार १२६ पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. धर्माबाद तालुक्यातील एकुण ५६ गावाचा समावेश असून शासनाने यासंदर्भात बँकांना स्पष्ट सूचना दिले आहेत, यामुळे ऐन पेरणीच्या हंगामात बँक कर्ज न मिळाल्याने सावकाराचे उंबरठे झिजवीत लागलेल्या शेतकऱ्यांना नवीन कर्ज उपलब्ध होणार आहे. यामुळे सावकाराचे देणे फेडणे शक्य होऊन बळीराजाची अर्थीक संकटातून सुटका होणार आहे.

शेती व्यवसाय हा निसर्गावर चालणारा जुगार आहे. दरवर्षी कोणत्या ना कोणत्या संकटाचा सामना करावा लागतो. यामुळे शेतीतील उत्पादनांच्या तुलनेत खर्च अधिक होतो. यामुळे शेतकरी कर्जबाजारी होण्याचे प्रमाण अधिक आहे. कर्जाच्या ओझाखाली असलेल्या शेतकऱ्याचे मुक्तता करण्यासाठी राज्य शासनाने कर्जमाफी योजना राबवली असून या योजनेमधील धर्माबाद तालुक्यातील डीसीसी व राष्ट्रीयकृत बँकेतील ४१२६ शेतकरी पात्र झाले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, पात्र शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पेरणीच्या काळात बँकेकडून कर्ज पुरवठा न झाल्याने काही शेतकऱ्यांना नाईलाजाने सावकाराचे उंबरठे झिजवावे लागले होते. नव्याने पीक कर्ज घेऊन डोक्यावरील सावकाराचे देणे देऊन शेतकऱ्याची आर्थिक ताणातून मुक्तता होणार आहे. यासाठी बँकांनी आता शासनाच्या सूचनाचे पालन करत कोणत्याही तांत्रिक अडथळ्याविना तातडीने नवीन पीक कर्ज मंजूर करून वितरित करणे आवश्यक आहे. बँकांनी वेळेत नवीन पीक कर्ज दिल्यास शेतकऱ्यांना पेरणी दरम्यान घेतलेले खाजगी सावकाराचे महागडे कर्ज परत करणे शक्य होईल. यामुळे व्याजाचा वाढणारा अतिरिक्त भुर्दंड थांबेल आणि शेतकऱ्यावर होणारा कर्जाचा डोंगर कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

# विविध प्रलंबित मागण्यांसाठी किसान सभेचे एसडीओ कार्यालयावर घेराव आंदोलन

किनवट/प्रतिनिधी-शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि योजना कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने १० ऑगस्ट रोजी किनवट येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर घेराव आंदोलन पार पडले. किसान सभेचे नेते कॉ.अर्जुन आडे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो शेतकरी व कामगार सहभागी झाले होते.

हुतात्मा गोंडाराजे मैदान येथून रॅलीची सुरुवात होऊन प्रमुख मार्गाने उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकली. दरम्यान शिष्टमंडळाने सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांशी विविध मागण्याविषयक चर्चा करून निवेदन सादर केले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिले असून वरिष्ठ स्तरावरील मागण्यांबाबत संबंधित विभागांशी पाठपुरावा करण्याचे मान्य केल्याचे कळविले आहे. आंदोलनाचे सभेत रुपांतर झाल्यानंतर कॉ. अर्जुन आडे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या नाकर्तेपणावर ताशेरे ओढले. सध्याचे सरकार हे श्रमिकविरोधी असून त्यांना कष्टकऱ्यांच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे नाही. देशाला अदानी-अंबानींसारख्या भांडवल-दारांच्या घशात घालण्याचे काम सुरु असल्याचा घणाघात त्यांनी केला. म्हणून आगामी काळात हे सरकार बदलण्याची आवश्यकता असून शेतकरी आणि कामगारांनी एकजूट होऊन संघर्ष तीव्र करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नियमित कर्जदार शेतकऱ्यांना २ लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्या, थकीतांना कर्जमुक्ती, शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावाचा कायदा, पीक विमा परतावा आणि बारा तास मोफत वीज, वन, गायरान व देवस्थान जमिनीची शेतकरी-शेतमजुरांना मालकी, रोहयो अंतर्गत मजुरांना काम आणि तालुक्यात सिंचन तलावांची निर्मिती, चार श्रमसंहिता व स्मार्ट मीटर रद्द करणे, योजना कर्मचाऱ्यांना किमान वेतन देणे आणि भारत-अमेरिका व्यापारी करार रद्द करणे, किनवट जिल्हा निर्मितीसह आदिवासी व वंचित घटकांच्या विविध मागण्यांचा निवेदनात अंतर्भाव करण्यात आला आहे.

या आंदोलनात जनार्दन काळे, शेषराव ढोले, शैलीया आडे, सुनिता बोणगीर, आडेलू बोनगीर, इरफान पठाण, सिताराम आडे, अंबर चव्हाण, तानाजी राठोड, मोहन जाधव, मनोज सल्लावार, इंदल राठोड, शेख फरीद बाबा, शेख चांद, नंदू मधुकर, इंदुताई डोंगरे, शिवाजी किरवले, विजय जाधव, रंगराव चव्हाण, सुदाम बर्गे, प्रशांत जाधव, साईनाथ राठोड यांच्यासह महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.


CHANGE IN NAME

My Old name is **SAYYED IMTIAZ HUSAIN** which now am changing as new Name **SYED IMTIYAJ HUSSAIN** Henceforth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address : H.No.2-5-405, Duleshah Raheman Nagar, Waghi Road, Near Sara Masjid, Khadakpura, Nanded Pin code No.431601

CHANGE IN NAME

My Old name is **TANVEER NAHID SAYYED** which now am changing as new Name **TANVEER NAHID SYED IMTIYAZ HUSSAIN** Henceforth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address : H.No.2-5-405, Duleshah Raheman Nagar, Waghi Road, Near Sara Masjid, Nanded Pin code No.431601

CHANGE IN NAME

My (old name) is **SYED ADILHUSSAIN AHMEDHUSSAIN** which now I am, changing as (new name) **SYED AADIL HUSSAIN SYED AHMED HUSSAIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**SYED AADIL HUSSAIN SYED AHMED HUSSAIN**

R/o S.V.Patel road Purna

Dist Parbhani-431511

M.No.- 9370622633

CHANGE IN NAME

My (old name) is **TABASSUM PARVEZ** which now I am, changing as (new name) **TABASSUM PARVEZ WASIYODDIN MUJAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**TABASSUM PARVEZ WASIYODDIN MUJAWAR**

R/o H.no.300 Block no.25, near Water tank

Labour colony Nanded-431602

M.No.- 9021442101


पान १ वरुन

## विधिमंडळातील फूट...

असेही त्यांनी स्पष्ट केले. शिंदे गटाने २०१८ ची पक्षघटना लोकशाही विरोधी असल्याचा दावा केला आहे. मात्र, याच घटनेच्या आधारे पदे मिळविली आणि निवडणुका लढविल्या. त्यावेळी कोणताही आक्षेप नव्हता. त्यामुळे आता सोयीने त्याच घटनेला विरोध करणे ही संधीसाधू भूमिका असल्याचे सिब्बल म्हणाले. पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याचे ठरविण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही. घटना चुकीची असल्यास नोंदणीबाबत कारवाई होऊ शकते; मात्र त्याआधारे दुसऱ्या गटाला मूळ पक्षाचे चिन्ह देता येणार नाही, असा ठाम युक्तिवाद ॲड.कपिल सिब्बल यांनी केला.


तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड
प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ,चिखलवाडी,
नांदेड. पिन-४३१६०१

जा.क्र.२०२६/जन्मप्रमाण/सिआर-३९४/२०२६ दिनांक २९/०७/२०२६

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्रीधर आनसाजीराव कदम वय २८ रा.मरळक (बु.), ता.जि.नांदेड यांनी दिनांक २९.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय,नांदेड येथे त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केलेली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव श्रीधर आनसाजीराव कदम वय २८ यांचा राहते घर मरळक (बु.), ता.जि.नांदेड या ठिकाणी दिनांक ०७.०४.१९९८ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २९.०६.२०२६ रोजी तहसिल कार्यालय, नांदेड येथे अर्ज सादर केलेला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय, नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक- /०७/२०२६
स्थळ-नांदेड

स्वाक्षरित/-
तहसिलदार नांदेड


# अखेर अण्णासाहेब पाटील महामंडळाचे एमडी बदलले

मुंबई/प्रतिनिधी-मराठा तरुण उद्योजकांना कर्ज प्रकरणी विलंब करणाऱ्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांची अखेर मंगळवारी बदली करण्यात आली. त्यांच्या जागी अविनाश रणखांब यांची नवीन व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महामंडळाच्या कर्ज प्रकरणांमध्ये विलंब तसेच मंजूर झालेली आशयपत्रे अचानक रद्द केल्याच्या तक्रारी मराठा समाजातील तरुण उद्योजकांनी केल्या होत्या. महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी राज्यातील पाच जिल्ह्यांचा दौरा करून या तक्रारी जाणून घेतल्या आणि त्याचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला. महामंडळाकडून कर्जासाठी मंजुरी मिळालेल्या प्रकरणांच्या तुलनेत प्रत्यक्ष निधी अत्यल्प मिळत असल्याचा आरोपही नरेंद्र पाटील यांनी केला होता. सुमारे १,५०० कोटी रुपये अपेक्षित असताना केवळ १५२ कोटी रुपये मिळाल्याचे त्यांनी म्हटले होते. देशमुख यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत पाटील यांनी त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. देशमुख यांच्यावर कारवाई न झाल्यास आपण अध्यक्षपदाचा राजीनामा देऊ, असा इशाराही नरेंद्र पाटील यांनी दिला होता. अखेर राज्य सरकारने देशमुख यांची बदली करून अविनाश रणखांब यांची नियुक्ती केली आहे. या निर्णयामुळे रखडलेल्या कर्जप्रकरणांना आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सीसीएमपी धारक होमिओपॅथिक डॉक्टरांच्या एमएमसी नोंदणीला विरोध का?

## होमिओपॅथीक डॉक्टर संघटनेचा प्रश्न

उमरखेड/प्रतिनिधी-सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथीक डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) मधील नोंदणीवरून राज्यात ॲलोपॅथीक आणि होमिओपॅथीक डॉक्टरांमध्ये वाद निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर उमरखेड येथील होमिओपॅथीक डॉक्टर संघटनेने ही नोंदणी ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्यसेवेसाठी आवश्यक असल्याची भूमिका मांडली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, बीएचएमएस हा साडेपाच वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असून त्यात शरीरशास्त्र, शरीर क्रियाशास्त्र, औषधशास्त्रासह एक वर्षाची अनिवार्य इंटर्नशिप समाविष्ट आहे. त्यानंतर मॉडर्न फार्माकॉलॉजीचे अतिरिक्त प्रशिक्षण म्हणून सीसीएमपी हा एक वर्षाचा अभ्यासक्रम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिकविला जातो. हा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम असल्याचा गैरसमज पसरविला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाने २०१४ मध्ये कायद्यात सुधारणा करून सीसीएमपीधारकांसाठी शेड्यूल २८ अंतर्गत एमएमसीमध्ये स्वतंत्र नोंदणीची तरतूद केली आहे. एमबीबीएस डॉक्टरांची कमतरता असलेल्या ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागात कायदेशीर चौकटीत प्राथमिक आरोग्यसेवा देण्यासाठी ही नोंदणी गरजेची आहे, असा दावा संघटनेने केला. ही नोंदणी केवळ अधिकारासाठी नसून औषधोपचारांच्या मर्यादा, जबाबदारी आणि कायदेशीर चौकट निश्चित करण्यासाठी आहे. सीसीएमपीमुळे हे डॉक्टर ॲलोपॅथीक डॉक्टरांच्या समकक्ष होणार नाहीत, त्यांना मतदानाचा अधिकार मिळणार नाही किंवा ते अतिदक्षता रुग्णालये चालविणार नाहीत, मग हा विरोध का? असेही संघटनेने स्पष्ट केले. या प्रकरणाच्या अभ्यासासाठी शासनाने तज्ज्ञ समिती नेमली असून तिला एक महिन्याची मुदत दिली आहे. हा विषय न्यायप्रविष्ट असला तरी उच्च न्यायालयाने नोंदणीला स्थगिती दिलेली नाही, त्यामुळे अनावश्यक अडथळे आणू नयेत व स्पष्ट नियमावलीसह जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

पान १ वरुन

## महापालिकेच्या सर्वसाधारण...

कमी असल्याने नागरिकांना आपण आरोग्य सुविधा देण्यास कमी पडत आहोत असा आरोप नगरसेवकांनी केला. आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी आरोग्य विभागाच्या कारभारात सुधारणा करण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात दिले. वार्ड विकास निधी मध्ये वाढ करण्याची मागणी सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी सभागृहात केली. तसेच महापालिका प्रशासनाने जादा दराने तुरटी खरेदी केली असून त्याची चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक साबेर चाऊस यांनी केली. कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करावे, सिडकोतील म.बसवेश्वर पुतळ्याचे सुशोभिकरण करावे, सिडको भागात कचऱ्याचे ढिग साचले असून नाल्याचे पाणी रस्त्यावर जमा झाले. सिडको भागातील स्वच्छतेकडे प्रशासन लक्ष देत नाहीत. अविकसित भागातील विकासकामांना प्राधान्य द्यावे व अन्य प्रश्नांवर सभागृहात चर्चा झाली. इतर विकास प्रश्नांवर सभागृहात चर्चा करण्याची मागणी नगरसेवकांनी केली असता महापौर कविता मुळे यांनी गोंधळातच सभा गुंडाळली.

## विडी कामगारांना...

यामध्ये १९२ रुपये मूळ वेतन आणि १६९ रुपये महागाई भत्ता समाविष्ट आहे. हे वेतन एक हजार विड्या वळणाऱ्या कामगारांसाठी लागू राहणार आहे.सुधारित वेतनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि थकीत वेतनाची वसुली याबाबत कामगार विभागाने काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे राज्यातील हजारो विडी कामगारांना त्यांच्या हक्काच्या किमान वेतनाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४